• वर्ष : ०३ • अंक : २०३ • पुणे • सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

Epaper : www.aparv.com

दैनिक आरंभ

# अजरामर पर्व संपले

## उरले उरात काही 'आवाज' चांदण्यांचे, आशा भोसले यांचे निधन, आज होणार अंत्यसंस्कार

### आशा... फक्त सुरांची 'चांदणी' नाही... जीवनाला कलाटणी देणारा प्रवासही

### लोअर परळ येथील घरी अंत्यदर्शन; आशा भोसले यांच्या रूपात मंगेशकर कुटुंबातील दुसरा तारा गमावला



September 8, 1933 - April 12, 2026



## अमर राहतील सुर

**आशा भोसले यांचे जाणे म्हणजे केवळ एका व्यक्तीचा अंत नाही, तर भारतीय संगीताच्या इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय संपला आहे. त्यांच्या आवाजाने कोट्यवधी लोकांच्या आयुष्यात आनंद, भावना आणि प्रेरणा निर्माण केली. आज त्या आपल्यात नसल्या तरी त्यांचे सूर, त्यांची गाणी आणि त्यांची कला सदैव जिवंत राहणार आहे. "सुरांची सुंदर बाग आज उजाड झाली" — अशा शब्दांत व्यक्त होणारी हळहळच त्यांच्या महानतेची साक्ष देते.**

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

चांदण्यात फिरताना प्रियकराने हात धरला म्हणून मनाशी दाटणारी नाजूक हुरहूर असो, हरवलेल्या प्रीतीच्या दंशाने विव्हल होऊन 'एकसौ सोला चांद की राते' परत करायला निघालेली विफलता असो, मल्मली तारुण्याची दुलई पांघरून पहाटे पहाटे प्रियकराच्या मिठीत शिरण्याचे थेट आव्हान असो, नशेचे दम भरून शरीरासह सारे काही भिरकावून देण्याची बेभान झिंग असो की आयुष्यभर भोगलेल्या वेदना ओसंडून ओठावर हसू आल्याची दुखरी कबुली; स्त्री-जन्माच्या वाट्याला येणाऱ्या हरेक क्षणाला जिवंत करणाऱ्या अजरामर आवाजाची सम्राज्ञी अखेरचा निरोप घेऊन पृथ्वीतलावरून निघून गेली आहे. त्यांच्यावर आज अंत्यसंस्कार होणार आहेत.

शनिवारी रात्री उशीरा अत्यवस्थ स्थितीत आशाताईंना रुग्णालयात दाखल केल्याची बातमी आली. अवघी रात्र अस्वस्थतेत सरली आणि रविवार उगवला, तो त्यांच्या वियोगाची बातमी घेऊनच. तब्बल आठ दशकांच्या सुरेल कारकीर्दीत करोडो रसिकांची हृदये घायाळ करत राहिलेली आशा भोसले नावाची लखलखती ऊर्जा अखेर हृदय बंद पडून मंद होत जावी, हा नियतीचा क्रूर डाव म्हणावा की वाटेतल्या काट्याकुट्यांची पर्वा न करता खमक्या स्वाभिमानाने रंगवत नेलेल्या एका सुरेल मनस्वी डावाची सांगता? दगडाच्या देवाला पाझर फुटेल अशी प्रार्थना, ऐन जवानीत फुरफुरणारी मदमस्त लावणी, अवखळ मिश्कील प्रणयगीते, प्राण कंठाशी आणणारा विरहाचा कल्लोळस्वर, हजारो घाव सोसून जर्जर झालेल्या आत्म्याचा आर्त टाहो, अल्लड बाळाला शांतवणारी अंगाई, अंगात वीज खेळवणारी फडकती क्लब-साँग्ज, मध्यरात्री झरणाऱ्या एकट्या अश्रूंना सोबत करणाऱ्या मऊ मधाळ गझला; हे सारे-सारे मनमुक्तपणाने उधळून शांत झालेल्या आशाताईंचा देह वयोमानानुसार अनंतात विलीन झाला एवढेच... पण त्यांनी रंगवलेल्या मैफिलीत तर त्या असतीलच! "इस अंजुमनमें आपको आना है बारबार" असे त्याच नव्हत्या का म्हणाल्या? त्या जीवघेण्या आमंत्रणाच्या कातील मदहोशीची धुंदी वियोगाच्या बातमीने आणखी गडद होईल आणि डोळ्यातले पाणी खळणार नाही, हे मात्र खरे! त्या दोघी इथे होत्या तेव्हा लोकांनीच दोघींमध्ये वणवे पेटवले. आता त्या दोघी तिथे शांतपणे एकमेकींना भेटतील... स्वर्गातल्या त्या जादुई दुनियेत आता लतासोबत आशाही असेल; पण या दोघींच्या विरहाने आक्रंदणाऱ्या करोडो रसिकांच्या अश्रूंना आज पारावार नसेल.. लता मंगेशकर नावाच्या स्वरवृक्षाच्या सावलीतून बाहेर पडून हिंदी चित्रपट संगीताच्या सुवर्णयुगात स्वतःसाठी वेगळी जागा तयार करणाऱ्या आशाताईंनी पार्श्वगायनात केलेल्या अनेकविध प्रयोगांची गणती करणे खरोखर मुश्किल. भारतातील अनेक भाषांमध्ये त्या गायल्याच शिवाय पश्चिमी संगीताची जादूही त्यांनी विलक्षण फिरत असलेल्या आपल्या गळ्यावर बेमालूम खुबीने चढवली. मराठी भावगीतांसह अन्य गैरफिल्मी प्रकारात त्यांनी केलेली मनसोक्त मुशाफिरी त्यांच्यातल्या प्रयोगशील गायिकेची सामर्थ्यस्थळे दर्शवणारी!

व्यक्तिगत आयुष्यात मांडलेले डाव मोडले, काही नाती तुटली, काही तोडावी लागली, जोडली ती जुळली नाहीत, आप्तांचा वियोग सोसला, पोटच्या मुलांचे अकाली मृत्यू पाहावे लागले; हे सारे दुःख आशाताईंनी हिमतीने पचवले आणि त्या कल्लोळातून उगवलेले त्यांचे गाणे अधिकच प्रगाढ, प्रगल्भ होत गेले. आता यापुढे उजव्या कानाच्या मागे मानेवर झुलणारे फुल माळून मनमुक्त हसत मैफिलीत रंगलेल्या, आयुष्यातले कडूगोड अनुभव मोकळेपणाने सांगताना कधी हातचे काही न राखणाऱ्या आशाताई दिसणार नाहीत हे खरे, पण पहाट होईल तेव्हा त्यांचीच भूपाळी ऐकू येईल... कुणावर जीव जडेल तेव्हा काळजात नेमके काय फुलते आहे हे त्यांची प्रणयगीते समजावतील... मध्यरात्रीचा शृंगार त्यांच्यांच गाण्यांनी सजेल... मन मोडेल, काटा घुसेल तेव्हा त्याच फुंकर घालायला येतील... आणि सगळे आयुष्य विफल आहे असे वाटून डोळे भरून येतील तेव्हा आशाताईंचे गाणेच आपल्याला कुशीत घेईल...म्हणजे त्या असतीलच. इथेच. आपल्याबरोबरच. ज्येष्ठ पार्श्वगायिका आणि पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित आशा भोसले यांचे रविवारी दुपारी सव्वा बाराच्या सुमारास ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झाले. त्यांचे काही अवयव निकामी (मल्टीऑर्गन फेल्युअर) झाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती त्यांच्यावर उपचार करणारे इंटर्नल मेडिसीन तज्ज्ञ डॉ. प्रतीत समदानी यांनी दिली.

शनिवारी संध्याकाळी त्यांची घरीच तब्येत अचानक बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. शनिवारी रुग्णालयात दाखल करताना त्यांची प्रकृती चिंताजनक होती. त्यांना छातीच्या संसर्गाचा त्रास होता. त्याचा हृदयावर ताण येऊन त्यांना घरीच हृदयविकाराचा झटका आला. त्यांची प्रकृती अधिक खालावल्याने कुटुंबीयांनी त्यांना तत्काळ रुग्णालयात दाखल केले.

## आशा भोसले : स्वरांची अजरामर दुनिया आणि संघर्षातून घडलेलं अष्टपैलू व्यक्तिमत्त्व

**विशेष लेख : आतील पानात**

## आशा भोसले यांच्याकडून तुम्ही काय शिकू शकता?

१. **अडचणींवर मात करण्याची जिद्द**
लहान वयात वडिलांचे निधन, आर्थिक अडचणी आणि वैयक्तिक आयुष्यातील संघर्ष या सगळ्यांवर मात करून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली. परिस्थिती कितीही कठीण असली तरी हार मानू नये, हे त्यांच्या आयुष्यातून शिकायला मिळते.

२. **स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणे**
लता मंगेशकर यांच्यासारख्या महान गायिकेच्या सावलीत असूनही आशा भोसले यांनी स्वतःची स्वतंत्र शैली तयार केली. इतरांशी तुलना न करता स्वतःची खास ओळख निर्माण करणे महत्त्वाचे आहे.

३. **सतत शिकत राहण्याची वृत्ती**
त्यांनी क्लासिकल, पॉप, गझल, कॅबरे अशी वेगवेगळ्या प्रकारची गाणी गाऊन स्वतःला सतत नव्याने घडवले. बदलत्या काळानुसार स्वतःला अपडेट ठेवणे किती गरजेचे आहे, हे यातून दिसते.

४. **धाडसी निर्णय घेण्याची तयारी**
वैयक्तिक आयुष्यात त्यांनी स्वतःचे निर्णय स्वतः घेतले, मग ते विवाहासारखे असोत किंवा करिअरशी संबंधित. आयुष्यात कधी कधी धाडसाने निर्णय घेणे आवश्यक असते.

५. **मेहनत आणि सातत्य यांचे महत्त्व**
१२ हजारांहून अधिक गाणी आणि अनेक दशकांचा प्रवास हे त्यांच्या अथक मेहनतीचे फळ आहे. यश मिळवण्यासाठी सातत्य आणि कठोर परिश्रम यांना पर्याय नाही.

६. **अपयशातून पुन्हा उभे राहणे**
पहिल्या वैवाहिक आयुष्यातील अपयशानंतरही त्यांनी आयुष्य थांबू दिले नाही. प्रत्येक अपयश ही नवीन सुरुवात असू शकते, हा मोठा संदेश त्यांच्या आयुष्यातून मिळतो.

७. **आवड आणि काम यांचा संगम**
संगीतावरील प्रेम आणि काम यांचा सुंदर मिलाफ त्यांनी साधला. जे काम आवडीने केले जाते, त्यात यश मिळण्याची शक्यता अधिक असते. तुम्हाला यश मिळवायचे तर या सात गोष्टी लक्षात ठेवा.



आशा भोसले यांच्या जाण्याने भारतीय संगीत क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आशा भोसले यांच्या वैयक्तिक संबंधांमुळे अनेक आठवणी आपल्या मनात दाटून आले आहे.

- द्रौपदी मुर्मू, राष्ट्रपती



आशाताईंची गाणी लोकांच्या जीवनात सदैव गुंजत राहतील. आशा भोसले यांच्या विलक्षण सांगीतिक प्रवासाने भारतीय सांस्कृतिक वारसा समृद्ध केला आणि जगभरातील असंख्य हृदयांना स्पर्श केला. त्या पिढ्यानपिढ्या प्रेरणा देत राहतील.

- नरेंद्र मोदी, पंतप्रधान



लोकांच्या मनांत आवाजाच्या रुपाने त्या कायम अमर राहतील. आवाज आणि शैलीतून आशा भोसले यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे. या दुखद प्रसंगी मंगेशकर कुटुंबीयांबद्दल संवेदना.

- राहुल गांधी, विरोधी पक्षनेते



आशा भोसले यांच्या रूपात मंगेशकर कुटुंबातील दुसऱ्या ताऱ्याला आपण गमावले आहे. आयुष्यातील बहुतांश काळ त्यांनी संगीताची सेवा केली. त्यांचे आयुष्य प्रेरणादायी होते. आशा भोसले यांच्यासारख्या ईश्वरीय आवाज असलेल्या गायिका निघून गेल्या.

- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री




भारतीय संगीत सृष्टीतील अढळ ध्रुवतारा आणि आपल्या सुरावलींनी अवघ्या जगाला मोहिनी घालणाऱ्या आशा भोसले यांच्या निधनामुळे देशाने एक महान स्वरसम्राज्ञी गमावली आहे. महाराष्ट्रातल्या घराघरांतल्या प्रत्येकाला आपल्या परिवाराचा सदस्य गमावल्याचे दुःख आहे.

- एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री



आशा भोसले यांच्या निधनाने संगीत क्षेत्रातील सुवर्णयुगाचा अंत झाला त्यांच्या आवाजात विलक्षण माधुर्य, विविधता आणि भावनांची अप्रतिम अभिव्यक्ती होती. त्यांचा संगीत प्रवास म्हणजे कठोर परिश्रम, सातत्य आणि कलेप्रती असलेल्या निष्ठेचे प्रतीक आहे.

- सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री



आशा भोसले केवळ देशातीलच नाही तर संगीतविश्वातील सिद्धहस्त आणि प्रतिभासंपन्न पार्श्वगायिका होत्या. आपल्या अवीट स्वरांनी, विविध संगीत प्रकार लीलया गाण्याच्या क्षमतेने त्यांनी संगीत रसिकांच्या अनेक पिढ्यांवर राज्य केले.

- जिष्णू देव वर्मा, महाराष्ट्राचे राज्यपाल



दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा



## थोडक्यात पण महत्वाचे



### धायरी गाव येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

धायरी (आरंभ पर्व) : श्री धारेश्वर महादेव संस्थान धायरी, श्रीमंत श्री धारेश्वर तरुण मंडळ धायरी तसेच समस्त धायरी ग्रामस्थ यांच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम श्री मळाई माता मंदिर येथे पार पडला. यावेळी महात्मा ज्योतिबा फुले तसेच सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी व ग्रामस्थांनी अभिवादन केले. कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. याप्रसंगी धायरी गावातील ग्रामस्थ, विविध संस्थांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक एकोपा आणि फुले दांपत्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.



### महिला सक्षमीकरणासाठी मार्गदर्शन; अनुलोमच्या माध्यमातून माहिती

पुणे (आरंभ पर्व) : आंबेगाव पठार, धनकवडी येथील सूर्या चौक येथे अनुगामी लोकराज्य महाभियान (अनुलोम) खडकवासला भाग यांच्या वतीने महिलांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजात धर्मरक्षक म्हणून चांगले कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करत त्यांना विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. या कार्यक्रमात जनसेविका सौ. नयन निलेश चव्हाण यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांनी स्वावलंबी बनण्यासाठी बचत गट (Self Help Group) स्थापन करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचे आवाहनही त्यांनी केले. महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी शिक्षण, स्वावलंबन आणि संघटन यावर भर देणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमास धर्म रक्षक दल पुणे चे सदस्य निखिल पालकर, लहू दादा महानूर, सोमनाथ पायगुडे, अरविंद बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महिलावर्गातून प्रिया मोकाशी, सारिका पायगुडे, ऋचा चाकणकर, मनीषा जाधव, निझासा दीक्षित, दीपिका सात्पे, कल्पना चित्रेवार, पुनम कुंभार, देविका बेंदुगडे, नेहा बेंदुगडे, कोमल उतेकर, रिया नारलावार, गीता बेंदुगडे, सोनाली मनपकार या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी अनुलोम मित्र तानाजी कांबळे व दिलीप रायकर यांनीही सहभाग नोंदवून कार्यक्रमास सहकार्य केले. कार्यक्रमात महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शासकीय योजनांविषयी अधिक जाणून घेण्याची उत्सुकता दर्शवली. या उपक्रमामुळे महिलांना स्वावलंबनाच्या दिशेने नवे मार्गदर्शन मिळाले असून, परिसरात महिला सक्षमीकरणासाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.



### आमदार शेखर निकम यांच्या पाठपुराव्याने कर्मचाऱ्यांना अखेर न्याय

चिपळूण (आरंभ पर्व) : ही घटना केवळ कामगारांच्या न्यायाची नाही, तर लोकप्रतिनिधी आपल्या शब्दाला किती जागतो याचेही उत्तम उदाहरण ठरली आहे. आमदार शेखर निकम यांची कार्यपद्धती - संवेदनशीलता, सातत्य आणि ठाम पाठपुरावा - ही जनतेसाठी आशेचा किरण ठरत आहे. चिपळूण तालुक्यातील मांडकी प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेतील कर्मचाऱ्यांचा अनेक वर्षांचा संघर्ष अखेर यशस्वी ठरला. किमान वेतन आणि शासनाच्या मूलभूत सुविधा न मिळाल्याने त्रस्त असलेल्या या कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यात आमदार शेखर निकम यांच्या संवेदनशील आणि कृतीशील नेतृत्वाचा मोठा वाटा ठरला आहे. सन २००१ पासून कार्यरत असलेल्या या योजनेतील कामगारांनी वर्षानुवर्षे अन्याय सहन करत आपला लढा सुरू ठेवला. या संघर्षात आर.पी.आय. (कांबळे) पक्षाचे नेते प्रभाकर जाधव यांनीही सुरुवातीपासून महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी कामगारांच्या मागण्यांसाठी सातत्याने पाठपुरावा केला. जरी सध्या त्यांची तब्येत साथ देत नसली, तरी “लढत रहा, विजय आपलाच होईल” हा त्यांचा विश्वास कामगारांसाठी प्रेरणादायी ठरला.



### पुणे फोटोग्राफर्स असोसिएशनचा ‘फोटो फेअर’ उत्साहात संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : पुणे फोटोग्राफर्स अँड व्हिडिओग्राफर्स असोसिएशनच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित ‘फोटो फेअर’ आणि ‘विशेष गौरव सोहळा’ पुण्यात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या प्रदर्शनातून फोटोग्राफी क्षेत्रातील जागतिक स्तरावरील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अनुभव पुणेकर फोटोग्राफर्सना एकाच छताखाली घेता आला. प्रदर्शनाचे उद्‌घाटन मान्यवर कांजी भाई आणि सोनीचे अभिजीत यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. या फेअरमध्ये निकॉन, कॅनन, लुमिक्स, फ्युजी, एचपी, डिजिटेक आणि गोडॉक्स यांसारख्या नामांकित ब्रँड्ससह फोटो लॅब व कॅमेरा उपकरणांचे एकूण १८ स्टॉल्स उभारण्यात आले होते. पुण्यातील ६०० हून अधिक फोटोग्राफर्सनी प्रदर्शनाला भेट देत नवीन कॅमेरे, लेन्सेस आणि लाइटिंग तंत्रज्ञानाची माहिती घेतली. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे कॅमेरा रिपेअर तज्ज्ञांचा विशेष सत्कार. “ज्याप्रमाणे डॉक्टर मानवी शरीराची काळजी घेतात, त्याचप्रमाणे फोटोग्राफरच्या कॅमेऱ्याला जीवदान देण्याचे काम रिपेअरिंग तज्ज्ञ करतात,” अशा शब्दांत त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या हस्ते पुण्यातील सात प्रमुख कॅमेरा रिपेअर तज्ज्ञांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# आंबेगाव खुर्दमध्ये घरखरेदीदारांची फसवणूक?

## पैसे भरूनही फ्लॅट नाही; काही प्रकल्प अर्धवटच बंद



**आंबेगाव खुर्द (उद्धव खरड) (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील आंबेगाव खुर्द परिसरात काही बिल्डर्सकडून घरखरेदीदारांना मोठ्या प्रमाणात त्रास दिला जात असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. ग्राहकांनी लाखो रुपये भरल्यानंतरही त्यांना फ्लॅटचा ताबा मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत असून, काही ठिकाणी प्रकल्प अर्धवट ठेवून काम बंद केल्याच्या घटनाही उघड होत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, अनेक ग्राहकांनी फ्लॅट बुक करताना पूर्ण किंवा मोठ्या प्रमाणात रक्कम भरली आहे.

मात्र, व्यवहाराच्या स्पष्ट नोंदी नसणे, करारपत्रातील अटी अस्पष्ट ठेवणे आणि वेळोवेळी अतिरिक्त पैसे मागण्याचे प्रकार सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

काही प्रकरणांमध्ये ग्राहकांकडून अवैध वसुली, धमक्या आणि दबाव टाकल्याचेही आरोप होत आहेत. विशेष म्हणजे, काही बिल्डर्सने प्रकल्पाची सुरुवात करून २-३ टप्प्यांनंतर काम थांबवले आहे. त्यामुळे ग्राहकांचे पैसे अडकून पडले असून, घर मिळण्याचे स्वप्नही अधांतरी राहिले आहे. या परिस्थितीमुळे ग्राहकांचा विश्वास डळमळीत झाला असून, आर्थिक नुकसानही मोठ्या प्रमाणात होत आहे. दरम्यान, प्रशासनाकडून मोठ्या बांधकाम प्रकल्पांना परवानगी देण्यात आली असली तरी प्रत्यक्षात सुरक्षेचे नियम, पारदर्शकता आणि ग्राहक संरक्षण या बाबींमध्ये त्रुटी आढळत असल्याची चर्चा आहे. काही प्रकल्पांमध्ये सुरुवातीपासूनच व्यवहारातील अनियमितता असल्याचेही पुढे आले आहे.

“पैसे भरूनही फ्लॅट मिळत नाही, सतत नवीन मागण्या केल्या जातात, आणि काही वेळा धमक्यांनाही सामोरे जावे लागते,” अशी भावना अनेक ग्राहकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे, ज्यांना अशा प्रकारचा त्रास झाला आहे त्यांनी आपले अनुभव नोंदवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. या माध्यमातून ग्राहकांचा आवाज पुढे नेऊन न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

दरम्यान, ‘दै. आरंभपर्व’च्या माध्यमातून या प्रकरणाचा पाठपुरावा केला जाणार असून, ग्राहकांचा आवाज पुढे आणण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. आंबेगाव खुर्द परिसरातील या प्रकारांमुळे घरखरेदी करणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### सावधगिरीची गरज

**घरखरेदी करताना नागरिकांनी पुढील बाबींची विशेष काळजी घ्यावी : सर्व व्यवहारांचे लिखित आणि कायदेशीर पुरावे ठेवावेत, कोणत्याही दबावाखाली आर्थिक निर्णय घेऊ नयेत, बिल्डरची पार्श्वभूमी, प्रकल्पाची मंजुरी आणि कागदपत्रे तपासावीत, करारपत्र पूर्ण वाचूनच व्यवहार करावा**

### कायदेशीर कारवाईची शक्यता

**सतत ग्राहकांना त्रास देणाऱ्या आणि प्रकल्प अर्धवट सोडणाऱ्या बिल्डर्सविरुद्ध कायदेशीर कारवाई होऊ शकते, अशी माहिती समोर येत आहे. संबंधित प्रकरणांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.**

## महात्मा फुले यांना ‘भारतरत्न’ मिळावा : खा. ज्योती वाघमारे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' मरणोत्तर प्रदान करण्यात यावा, यासाठी केंद्र सरकारकडे विशेष आग्रह धरला जाईल," अशी ग्वाही खासदार ज्योती वाघमारे यांनी आज येथे दिली. महात्मा ज्योतिराव फुले द्विशताब्दी जयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित अभिवादन सभेत त्या बोलत होत्या. या प्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. खासदार वाघमारे यांनी गायलेल्या गीताने जिंकली मने या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे खासदार



ज्योती वाघमारे यांनी स्वतः महात्मा फुले यांच्या कार्यावर आधारित एक प्रेरणादायी गीत सादर केले. त्यांच्या सुश्राव्य आवाजातील या गीताने उपस्थित सर्वांची मने जिंकली आणि सभागृहात चैतन्य निर्माण झाले. लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी सांभाळतानाच कलेच्या माध्यमातून त्यांनी व्यक्त केलेल्या आदरांजलीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## जमिनी हडपणाऱ्या बिल्डर लॉबीवर कारवाई करा

### भाविकांच्या भावनांशी खेळ सुरू असल्याचा आरोप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे जिल्ह्यातील विविध गावांमधील सार्वजनिक देवस्थानच्या नावे असलेल्या 'इनाम' जमिनी बेकायदेशीररीत्या हडपण्याचे प्रयत्न बिल्डर लॉबीकडून सुरू असल्याचा खळबळजनक आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात शरद बाळासाहेब गोडांबे आणि रुपेश रवींद्र गुजराती यांनी पुणे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले असून, हा केवळ जमिनीचा प्रश्न नसून भक्तांच्या श्रद्धेशी आणि भावनेशी खेळण्याचा गैरप्रकार असल्याचे म्हटले आहे.



कायद्याच्या पळवाटांचा गैरवापर: महाराष्ट्र शासनाने देवस्थान जमिनींचे रक्षण करण्यासाठी आणि गैरव्यवहार रोखण्यासाठी वेळोवेळी महत्त्वाचे शासन निर्णय (GR) आणि परिपत्रके निर्गमित केली आहेत. मात्र, बिल्डर लॉबी आणि काही हितसंबंधी लोक या नियमांना हरताळ फाळून, कायद्यातील पळवाटा शोधून या जमिनी बळकावण्याचा प्रयत्न करत आहेत.

भाविकांच्या भावनेशी खेळ: सार्वजनिक देवस्थाने ही गावाच्या अस्मितेचा आणि श्रद्धेचा केंद्रबिंदू असतात. अशा जमिनींचे व्यावसायिकरण करून बिल्डर लॉबी भक्तांच्या भावनेचा अपमान करत असल्याचा संताप ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

न्यायालयीन भूमिका: सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, देवस्थान जमिनीचा खरा मालक स्वतः 'देव' असतो. असे असतानाही काही व्यक्ती स्वतःचे नाव लावून शासनाची दिशाभूल करत आहेत.

दडपशाहीचा प्रयत्न: या भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवणाऱ्या सजग नागरिकांवर आणि ग्रामस्थांवर खोटे गुन्हे दाखल करून त्यांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न काही ठिकाणी केला जात आहे.

शासनाने या गंभीर प्रकाराची तातडीने दखल घेऊन दोषींवर कारवाई न केल्यास, महाराष्ट्रातील सर्व गावांमधील (अठरापगड जातींचे) ग्रामस्थ आणि भाविक एकत्र येऊन मुंबईतील मंत्रालयावर विराट मोर्चा काढतील, असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## 'ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो'च्या माध्यमातून भरारी

- **पुणे जिल्हा 'MUK'चा द्वितीय वर्धापन दिन उत्साहात संपन्न**

**पुणे (वाकड) (दै. आरंभ पर्व)**

मराठा उद्योजकांना जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्या व्यवसायाला व्यापक स्वरूप देण्यासाठी 'मराठा उद्योजक कक्ष' (MUK) एक भक्कम व्यासपीठ ठरत आहे. वाकड येथील गझेबो वर्ल्ड ऑफ व्हेज येथे पार पडलेल्या पुणे जिल्हा 'मराठा उद्योजक कक्ष' च्या द्वितीय वर्धापन दिन सोहळ्यात आगामी 'ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो २०२६' च्या वेबसाईटचे दिमाखदार अनावरण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे यांसह राज्यातील पदाधिकारी, उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. "एकच लक्ष, मराठा उद्योग कक्ष" अशा घोषणांनी हा परिसर दुमदुमून गेला होता.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंतरराष्ट्रीय अध्यक्ष शिवश्री संजय वायाळ होते. त्यांनी आगामी एक्स्पोबद्दल सविस्तर माहिती देताना सांगितले की, "येणाऱ्या काळात होणाऱ्या या महा-एक्स्पोमध्ये नामवंत उद्योजक आणि इंडस्ट्री सेक्टरमधील दिग्गज सहभागी होणार आहेत. नेटवर्किंगच्या जोरावर पुढील पाच वर्षांत १ लाख नवीन उद्योजक घडवण्याचे आमचे स्वप्न आहे."

प्रमुख पाहुण्या शिवमती स्मिता भोलाणे (अथर्व वेल्थ मॅनेजमेंट) यांनी उद्योजकांना आत्मविश्वासाचा मंत्र दिला. त्या म्हणाल्या, "व्यवसायात केवळ टिकून न राहता त्याला व्यापक स्वरूप देण्याची गरज आहे. आपण केवळ कम्युनिटीसाठी नाही, तर खऱ्या अर्थाने उद्योजकांसाठी काम करत आहोत, ही भावना महत्त्वाची आहे."

शिवमती प्राजक्ता चव्हाण (डी के ऑटो हब) यांनी आपल्या भाषणात व्यवसायातील संधींवर प्रकाश टाकला. "जर आपल्याला आयुष्यात उंच भरारी घ्यायची असेल, तर व्यवसायाशिवाय पर्याय नाही," असे प्रतिपादन त्यांनी केले. या सोहळ्याचे खास आकर्षण म्हणजे www.globalmarathabusinessexpo.com या वेबसाईटचे अनावरण. मान्यवरांच्या हस्ते हे पोर्टल कार्यान्वित करण्यात आले. या वेबसाईटमुळे जगभरातील उद्योजकांना एक्स्पोची माहिती मिळवणे आणि नावनोंदणी करणे अधिक सोपे होणार आहे.

**'मराठा उद्योजक कक्षा 'च्या या यशस्वी वाटचालीमुळे आगामी मे महिन्यात होणाऱ्या 'ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो २०२६' बाबत उद्योजकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. एक्स्पो यशस्वी करण्यासाठी राज्यातील सर्वच पदाधिकारी सज्ज असल्याचे पाहायला मिळाले.**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुणे जिल्हा अध्यक्ष शिवश्री अर्जुन खामकर यांनी केले. त्यांनी मराठा उद्योजक कक्षाच्या प्रवासाचा आढावा घेताना सांगितले की, एक्सपो यशस्वी करण्याची ही सुवर्णसंधी आपल्याला आहे.

राज्यातील सर्वच पदाधिकाऱ्यांनी सर्वतोपरी मदत करावी असे आवाहन खामकर यांनी केले. एक्स्पोच्या माध्यमातून ज्ञानाची देवाणघेवाण होऊन मराठी पाऊल उद्योगात अधिक खंबीरपणे पडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## ‘ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२६’ ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

परदेशात उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ‘स्टडी स्मार्ट’च्या वतीने आयोजित ‘ग्लोबल एज्युकेशन फेअर 2026’ला पुण्यातील बोट क्लब येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या फेअरमध्ये यूके, यूएसए, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया, जर्मनी आणि दुबई येथील सुमारे ५० हून अधिक नामांकित विद्यापीठांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना थेट तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळाली.

विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून परदेशी शिक्षणासंदर्भातील विविध पर्यायांची माहिती घेतली. विशेष म्हणजे, या ठिकाणी विद्यार्थ्यांना आणि पालकांना पूर्णपणे मोफत मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले.

परदेशात शिक्षण घेण्याबाबत विद्यार्थ्यांच्या मनात अनेक प्रश्न असतात—योग्य देश व विद्यापीठाची निवड, शैक्षणिक कर्जाची प्रक्रिया, उपलब्ध शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप)



तसेच प्रवेश प्रक्रिया यासारख्या मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन या फेअरमध्ये करण्यात आले. त्यामुळे उपस्थित विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान झाले. ‘स्टडी स्मार्ट’चे संचालक चेतन जैन यांनी सांगितले की, या फेअरमुळे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील जागतिक शिक्षणाच्या संधींबाबत स्पष्ट दिशा मिळाली. यंदाच्या फेअरमध्ये ६०० हून अधिक विद्यार्थी आणि ९०० हून अधिक पालकांनी सहभाग घेत मोफत मार्गदर्शनाचा लाभ घेतला. तसेच आतापर्यंत १२ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमाच्या माध्यमातून परदेशातील विद्यापीठांची निवड केल्याची माहिती त्यांनी दिली.

# गंगानगरमध्ये पोलीस मदत केंद्राची स्थापना

## वाढत्या गुन्हेगारीवर लगाम घालण्याचा फुरसुंगी पोलिसांचा निर्धार

**फुरसुंगी- समीर आत्तार (दै. आरंभ पर्व)**

फुरसुंगी परिसरात वाढत्या गुन्हेगारी घटनांना आळा घालण्यासाठी आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने फुरसुंगी पोलीस स्टेशनच्या वतीने गंगानगर येथे नव्याने पोलीस मदत केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे परिसरातील गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यास मदत होणार असल्याचा विश्वास पोलिस प्रशासनासह स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे.




गेल्या काही महिन्यांपासून फुरसुंगी व गंगानगर परिसरात चोरी, भांडण, वाहन तोडफोड तसेच इतर किरकोळ गुन्ह्यांच्या घटना वाढत असल्याची तक्रार नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत होती. याची गंभीर दखल घेत फुरसुंगी पोलीस स्टेशनने तातडीने उपाययोजना करत गंगानगरमध्ये पोलीस मदत केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला.



या पोलीस मदत केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना त्वरित पोलीस सेवा उपलब्ध होणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी ११२ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधल्यास तात्काळ पोलिस मदत मिळणार असून, गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सतत गस्त आणि देखरेख वाढवण्यात येणार आहे. तसेच या केंद्रामुळे पोलिसांची उपस्थिती वाढून गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणार असल्याचे सांगितले जात आहे. फुरसुंगी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अमोल मोरे यांनी ‘पुणेकरांचा आवाज लोकहित न्यूज’शी बोलताना सांगितले की, “गंगानगरसह संपूर्ण फुरसुंगी पोलीस स्टेशनच्या हद्दीत गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. पोलीस मदत केंद्राच्या स्थापनेमुळे नागरिकांना अधिक जलद आणि प्रभावी सेवा देणे शक्य होईल. परिसर गुन्हेगारीमुक्त करण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे.”

दरम्यान, या निर्णयाचे स्थानिक नागरिकांनी स्वागत केले असून, पोलीस प्रशासनाने घेतलेल्या या पुढाकारामुळे परिसरात सुरक्षिततेची भावना अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. नागरिकांनीही पोलिसांना सहकार्य करून संशयास्पद हालचालींची माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या पोलीस मदत केंद्रामुळे गंगानगर आणि आसपासच्या परिसरात कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम होऊन गुन्हेगारीला प्रभावी आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६







## थोडक्यात पण महत्वाचे




### भेसळयुक्त आंबारस जप्त; अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : राजगुरूनगर जवळील राक्षेवाडी येथे अन्न व औषध प्रशासनाने कारवाई करून भेसळयुक्त आंबारस व मँगो पल्प तयार करण्यासाठीचे भेसळयुक्त साहित्य आणि रसायनाचा साठा जप्त करून नष्ट केला. सुमारे अडीच लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल पाहुन अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारीही ग्रामीण भागातील हा भेसळयुक्त प्रक्रिया प्रकल्प पाहून चकित झाले होते. राक्षेवाडी येथील पुरवठादार व मावळ तालुक्यात उर्से येथील महंमद एकरामुल उर्फ अक्रम गुलाम यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. कारवाईत मँगो पल्प व मँगो पल्प तयार करण्यासाठीची भेसळयुक्त साखर, दुध, रसायनमिश्रीत मुद्देमाल अन्न व रंग आदी मुद्देमाल प्रशासनाने कारवाई करून जप्त केला. सध्या ग्रामीण भागात यात्रा व लग्न सिझन असल्याने मँगो पल्पचा तयार आंबारस वापरण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. शंभर रुपयात एक किलो तयार आंबारस मिळत असल्याने लोकांना हा आमरस वापरण्याची भुरळ पडली आहे. परंतु हा मँगो पल्प शंभर टक्के भेसळयुक्त व केमिकल वापरून बनवला जातअसल्याचे आता उघड होत आहे. भेसळयुक्त आंबारस मुळे जुलाब, उलट्या, पोटदुखी आणि अन्नातून विषबाधा होण्याचा मोठा धोका असतो. रंगाचा अतिवापर आणि हानिकारक रसायनांच्या वापरामुळे दीर्घकालीन कर्करोगासारखे गंभीर आजार उद्भवू शकतात. असे याविषयी बोलताना सहायक आयुक्त ना. रा. सरकटे यांनी सांगितले. अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या येथील कारवाईत तब्बल तीन हजार २८२ किलो भेसळ व केमिकलयुक्त मँगोपल्पचा आंबारस नष्ट करण्यात आला. या कारवाईत अन्न व औषध प्रशासन विभागातील सहायक आयुक्त ना. रा. सरकटे, दक्षता विभागाचे अधिकारी वा. औ. शिंदे, स्वा. दा. मस्के, प्र. शि. कच्छवे सहभागी झाले होते.

### रमेश नन्नवरे यांचे निधन



शिरुरकासार (आरंभ पर्व) : शिरुरकासार तालुक्यातील बावी येथील रहिवासी असलेले रमेश शंकर नन्नवरे यांचे अपघाती निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे (वय ६०) होते. रमेश नन्नवरे हे अंत्यत मनमिळावू आणि शांत स्वभावाचे म्हणून परिचित होते. त्यांच्या अचानक निधनाने गावामध्ये शोककळा पसरली आहे. त्यांच्यावर मूळ गावी बावी येथे शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा, तीन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सी 24 तास चे पुणे ब्युरो चीफ अमोल उदमले यांचे ते सासरे होते.



### वडगाव परिसरातील आरएमसी प्लांट त्वरीत हलवावेत : खा. मेधा कुलकर्णी

पुणे (आरंभ पर्व) : वडगाव खुर्द परिसरातील आरएमसी प्लांट चालकांकडून नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे. यामुळे प्रदूषण आणि अपघातांच्या घटना वाढत आहेत. या परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे हे प्लांट्स तातडीने येथून हलवावेत, अशा सूचना राज्यसभा खासदार डॉ. प्रा. मेधा कुलकर्णी यांनी महापौर आणि महापालिका आयुक्तांकडे केली आहे. प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी शनिवारी सिंहगड रस्त्यावरील वडगाव खुर्द भागातील दत्तकृष्णाई मंगल कार्यालय ते प्रेयेजासिटी, मधुकोष सोसायटी, धायरी लेन १७अ, फॉर्चुनर सोसायटी परिसरातील अनधिकृत रेडीमिक्स प्लांटची पाहणी केली. प्रयेजा पुरम सोसायटीचे अध्यक्ष गणेश पिंपळे, सचिव ॲड. प्रितेश चांडगे, पवन मोकाशी, संतोष कुलकर्णी, राजेंद्र पाटील, श्रीमती शर्मिला नाखारे, निलेश घोडके, शेखर लोहोटे, प्रशांत गोहाड, मनीष वैद्य, गिरीश चोरघे, स्वाती टिळक, मंगला ठाकरे, नंदिनी कुलकर्णी, हरिहर घोडके, वासुदेव गोहाड यांच्यासह प्रयेजा पुरम, प्रयेजा सिटी या सोसायटीमधील नागरिक यावेळी उपस्थित होते. या पाहणीत कुठलेही नियम न पाळणे, आरएमसी प्लांटमधून होणारे प्रदूषण, रेडिमिक्स वाहून नेणाऱ्या वाहनांमुळे होणारी वाहतूक कोंडी, अशा अनेक गोष्टी निदर्शनास आल्यानंतर त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून कारवाई करण्याचे आदेश दिले. तसेच महापौर आणि पुणे महापालिकेचे आयुक्त यांनी याबाबत त्वरीत कारवाई करून हे आरएमसी प्लांट बंद करावेत आणि त्यांचे स्थलांतर करावे, अशी विनंती केली आहे. या भागातील अनधिकृत सिमेंट प्लांटमुळे या सर्व परिसरात होणारे अतिघातक प्रदूषण होत आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या सिमेंटची भुकटी मिसळून या भागातील रहिवाशांच्या घरात येत आहे. त्यामुळे लहान मुले, वृद्ध यांना श्वसनाचा त्रास होतो आहे. सदरचे रस्त्यावरून सिमेंट प्लांन्टमधून रेडीमिक्सची वाहतुक करणाऱ्या ढंपर, मिक्सर व इतर वाहने यांचे मधून रस्त्यावर खुप रेडीमिक्स सिमेंट पडते व त्यामुळे हवेत सिमेंटचे प्रमाण वाढत आहे. तसेच पडलेल्या सिमेंट वरून दुकाचीस्वारांचे अपघात होतात.

# नऱ्हे येथे चालकाला फिट; पीएमपी बसचा अपघात

## सुदैवाने जीवितहानी टळली, चालक उपचाराधीन

> एकंदरीत, नऱ्हे–मानाजीनगर येथील हा अपघात गंभीर स्वरूपाचा असला तरी नागरिकांचे प्रसंगावधान, स्थानिकांची तत्पर मदत आणि पोलिसांचा वेगवान प्रतिसाद यामुळे मोठी दुर्घटना टळली. मात्र या घटनेतून धडा घेत भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस पावले उचलणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हेगावहून स्वारगेटकडे प्रवासी घेऊन जाणारी पुणे महानगर परिवहन महामंडळाची (पीएमपी) बस रविवारी सायंकाळी नऱ्हे–मानाजीनगर परिसरात अपघातग्रस्त झाली. बस चालकाला अचानक फिट (आकडी) आल्याने त्यांचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि बस रस्त्याच्या कडेला असलेल्या कठड्याला धडकून थांबली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून मोठा अनर्थ टळल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.




श्री. लक्ष्मण साबळे, पुणे

घटनेच्या वेळी मानाजीनगर चौकात भाजी विक्रेते, स्थानिक नागरिक तसेच काही प्रवासी उपस्थित होते. हा परिसर नेहमीच वर्दळीचा असल्याने अपघाताची तीव्रता पाहता मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. मात्र रविवार असल्याने तुलनेने गर्दी कमी होती, त्यामुळे संभाव्य जीवितहानी टळल्याचे स्थानिकांनी सांगितले. अन्य दिवशी हा अपघात झाला असता तर परिस्थिती अधिक गंभीर झाली असती, असेही नागरिकांनी नमूद केले.

अपघात होताच परिसरातील नागरिकांनी प्रसंगावधान राखत घटनास्थळी धाव घेतली. बसमधील प्रवाशांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र स्थानिकांच्या मदतीने प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. त्याचवेळी बस चालकाला तातडीने बाहेर काढण्यात आले असता त्यांची प्रकृती बिघडलेली असल्याचे दिसून आले.

दरम्यान, काही नागरिकांनी तात्काळ स्थानिक डॉक्टरांना घटनास्थळी बोलावले. डॉक्टरांनी प्राथमिक उपचार सुरू केले असता चालकाला रक्ताची उलटी झाल्याचेही निदर्शनास आले. त्यामुळे काही काळ परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले. मात्र रक्ताची उलटी होण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पुढील तपासणी व उपचारासाठी अधिक वैद्यकीय मदतीची आवश्यकता असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

यानंतर चालकाला रुग्णवाहिकेद्वारे जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती सध्या नियंत्रणात असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

अपघाताची माहिती मिळताच बसच्या वाहकाने नऱ्हे पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. अपघातामुळे काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. हा मार्ग नेहमीच व्यस्त असल्याने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. मात्र पोलिसांनी तत्काळ उपाययोजना करत वाहतूक सुरळीत केली. या घटनेनंतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत चालकांच्या आरोग्य तपासणीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अनेक चालक दीर्घ काळ काम करत असल्याने त्यांची नियमित वैद्यकीय तपासणी होणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. अचानक उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांमुळे अशा प्रकारचे अपघात घडू शकतात, त्यामुळे परिवहन विभागाने याबाबत गांभीर्याने उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

तसेच, आपत्कालीन परिस्थितीत कसे वागावे याबाबत चालक व वाहकांना विशेष प्रशिक्षण देणे गरजेचे असल्याचेही तज्ज्ञांचे मत आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

## पुण्यात यामाहाचा ‘एफझेड-एस एफआय हायब्रीड’ मेगा मायलेज चॅलेंज

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इंडिया यामाहा मोटर (आयवायएम) प्रा. लि.तर्फे पुण्यामध्ये एफझेड-एस एफआय हायब्रीड मोटरसायकलसाठी पहिल्या ‘मेगा मायलेज चॅलेंज’चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश ग्राहकांना स्मार्ट मोटर जनरेटर (SMG) तंत्रज्ञानामुळे मिळणारी इंधन कार्यक्षमता आणि आधुनिक वैशिष्ट्यांची प्रत्यक्ष अनुभूती देणे हा होता. विजयलक्ष्मी ऑटो, सातव ऑटोमोटिव्ह, शेलार ऑटो व्हील्स, मोनार्क ऑटोमोबाइल्स, एसके ऑटो आणि आयुष मोटर्स या अधिकृत डिलरशिप्सच्या सहकार्याने हा उपक्रम पार पडला. या चॅलेंजमध्ये यामाहा ग्राहकांसह त्यांच्या कुटुंबीयांनीही उत्साहाने सहभाग घेतला. एफझेड-एस एफआय हायब्रीडमध्ये असलेली स्मार्ट मोटर जनरेटर (SMG) आणि



स्टॉप अँड स्टार्ट सिस्टीम (SSS) ही तंत्रज्ञान प्रणाली इंधन बचत आणि उत्सर्जन कमी करण्यास मदत करते. यामुळे गाडी शांतपणे सुरू होते, इलेक्ट्रिक सहाय्यित टॉर्कमुळे चांगला वेग मिळतो आणि निष्क्रिय अवस्थेत इंजिन बंद होऊन इंधनाची बचत होते. पर्यावरणपूरक आणि किफायतशीर प्रवासासाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. या मायलेज चॅलेंजची सुरुवात कोथरूड येथील योगी हॉलिडे रिसॉर्टपासून झाली.

## नारायणराव थोरात यांचे संस्कार प्रेरणादायी ठरतील - उद्धवजी ठाकरे

### ज्येष्ठांच्या मान सन्मानासह,भव्य लक्ष्मी नारायण प्रवेशद्वाराचे लोकार्पण




**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

तालुक्यातील शिरोली खुर्द ता.जुन्नर गावचे सुपुत्र, शिवसेना उपनेते बबनराव थोरात यांचे वडील स्व.नारायण अर्जुन थोरात यांचा प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी राज्याच्या विविध भागातून आलेल्या मान्यवरांनी प्रतिमापूजन करून अभिवादन केले. या पवित्र सोहळ्यास शिवजन्मभूमी जुन्नर तालुक्याचे सुपुत्र, अयोध्या येथे श्रीरामलल्ला गर्भगृहात कीर्तन करणारे एकमेव कीर्तनकार, जगदगुरु श्री तुकोबाराय विश्व कल्याण मिशनचे संस्थापक, जगदगुरुकृपांकित डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर यांची कीर्तनरुपी भक्तिमय सेवा संपन्न झाली. महाराजांच्या मुखातून बाहेर पडलेल्या संवादाने उपस्थित सर्वांना एक आत्मिक शांती मिळाली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. नारायणदादा थोरात यांच्या सामाजिक कार्याची,गावच्या विकास कामातील योगदानाची, शेती आणि कौटुंबिक जबाबदारीतील अनेक आठवणींना उजाळा दिला. या विशेष प्रसंगी थोरात परिवाराने सामाजिक बांधिलकी जपत स्व. नारायण अर्जुन थोरात यांच्या स्मरणार्थ ओझर लेण्याद्री मुख्य मार्गावर उभारलेल्या 'लक्ष्मी नारायण' या भव्य प्रवेशद्वाराचे लोकार्पण महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या ऑनलाईन उपस्थितीत करण्यात आले.यावेळी नारायणराव थोरात यांचे संस्कार प्रेरणादायी ठरतील असे ठाकरे यांनी सांगितले. कार्यक्रमानिमित्त शिरोली खुर्द गावातील ७० वर्षा पुढील जेष्ठ नागरिकांचा थोरात परिवाराच्या वतीने पाद्यपूजन व पोशाख देऊन सन्मान करण्यात आला. प्रास्तविक पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सुभाष मोरे यांनी केले, सूत्रसंचालन लक्ष्मण दातखिळे यांनी केले. शिवसेना उपनेते बबनराव थोरात यांनी ऋण व्यक्त केले.

# स्वरांची चांदणी : संघर्षातून घडलेलं व्यक्तिमत्त्व

> भारतीय संगीतविश्वात अनेक महान कलाकारांनी आपला ठसा उमटवला; मात्र काही मोजकी नावं अशी आहेत, जी केवळ कलाकार म्हणून नव्हे तर एका युगाचे प्रतीक म्हणून ओळखली जातात. आशा भोसले हे त्यापैकीच एक तेजस्वी नाव. त्यांच्या जाण्याने केवळ एक व्यक्ती नाही, तर भारतीय संगीताचा एक संपूर्ण अध्यायच संपल्याची भावना आज सर्वत्र व्यक्त होत आहे.

**(दै. आरंभ पर्व)**

आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी झाला. सुप्रसिद्ध गायक दीनानाथ मंगेशकर यांच्या घरात जन्मलेल्या आशाताईंच्या आयुष्याची सुरुवातच संगीताच्या वातावरणात झाली. मात्र, लहान वयातच वडिलांचे निधन झाल्याने कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले. अशा परिस्थितीत आशाताईंनी लहान वयातच गायनाची वाट धरली आणि मोठी बहीण लता मंगेशकर यांच्यासोबत कुटुंबाची जबाबदारी उचलली.

त्यांचा प्रवास सोपा नव्हता. सुरुवातीला त्यांना मोठ्या संधी





मिळाल्या नाहीत. अनेकदा दुय्यम दर्जाची गाणी, कमी बजेटचे चित्रपट, आणि मर्यादित व्यासपीठ यांच्याशी सामना करत त्यांनी आपली ओळख निर्माण केली. पण त्यांच्या आवाजातील वैशिष्ट्य, ऊर्जा आणि प्रयोगशीलता यामुळे त्यांनी लवकरच स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

आशा भोसले यांची खरी ताकद म्हणजे त्यांचे अष्टपैलुत्व. शास्त्रीय संगीतापासून ते गझल, भजन, पॉप, कॅबरे, लावणी अशा विविध प्रकारांमध्ये त्यांनी सहजपणे वावर केला. ‘पिया तू अब तो आजा’, ‘दम मारो दम’, ‘चुरा लिया है तुमने’, ‘दिल चीज क्या है’, ‘उडे जब जब जुल्फे तेरी’ यांसारख्या असंख्य गाण्यांनी त्यांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. त्यांच्या आवाजातली खुमारी, चपळता आणि भावनांची खोली यामुळे प्रत्येक गाणं जिवंत वाटायचं.

त्यांच्या आयुष्यातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे संगीतकार आर. डी. बर्मन यांच्यासोबतची जोडी. या जोडीने हिंदी चित्रपटसृष्टीला अनेक सुपरहिट गाणी दिली. दोघांचं नातं केवळ वैयक्तिक नव्हतं, तर संगीताच्या दृष्टीनेही अत्यंत समृद्ध होतं. या सहकार्यामुळे भारतीय चित्रपटसंगीताला एक नवीन दिशा मिळाली.

आशा भोसले यांच्या वैयक्तिक आयुष्यातही अनेक चढ-उतार आले. वयाच्या १६ व्या वर्षी केलेले लग्न, त्यानंतर आलेले तणाव, आणि नंतरचा संघर्ष—या सगळ्यांतून त्यांनी स्वतःला सावरत पुन्हा उभं राहण्याची ताकद दाखवली. त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक टप्पा हा प्रेरणादायी ठरतो.

त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी तब्बल १२ हजारांहून अधिक गाणी गायली. हिंदीसह मराठी, बंगाली, गुजराती, तमिळ, तेलुगू अशा अनेक भाषांमध्ये त्यांनी आपली गायकी सादर केली. त्यामुळे त्या केवळ भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही लोकप्रिय ठरल्या.

त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना पद्मविभूषण, दादासाहेब फाळके पुरस्कार, महाराष्ट्र भूषण यांसारख्या अनेक प्रतिष्ठित सन्मानांनी गौरविण्यात आले. त्यांनी सात वेळा फिल्मफेअर पुरस्कार पटकावले. मात्र, त्यांच्या मते सर्वात मोठा पुरस्कार म्हणजे रसिकांचं प्रेम.

आशा भोसले यांचा आवाज म्हणजे केवळ सुर नव्हते, तर भावनांचा महासागर होता. त्यांच्या गाण्यांतून आनंद, दुःख, प्रेम, वेदना, उत्साह. सर्व भावना जिवंत व्हायच्या. म्हणूनच त्यांच्या गाण्यांनी अनेक पिढ्यांच्या आयुष्यात खास स्थान निर्माण केलं.

आज त्या आपल्यात नसल्या तरी त्यांचे सूर कायम जिवंत राहतील. त्यांची गाणी, त्यांची शैली आणि त्यांची ऊर्जा येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देत राहील. आशा भोसले हे नाव म्हणजे भारतीय संगीताच्या इतिहासातील एक अजरामर अध्याय आहे. त्यांच्या जाण्याने एक युग संपले असले तरी त्यांच्या सुरांची गूंज कधीही थांबणार नाही. ती कायम काळाच्या पलीकडे घुमत राहील.

### आशा भोसले यांच्या गाजलेल्या गाण्यांची झलक

| गीत | चित्रपट | संगीतकार |
|---|---|---|
| ये रास्ते हैं प्यार के | ये रास्ते हैं प्यार के | रवी |
| सबा से ये कह दो | बँक मॅनेजर | मदनमोहन |
| रात अकेली हैं | ज्वेलथीफ | सचिन देव बर्मन |
| परदे में रहने दो | शिकार | शंकर–जयकिशन |
| मूड मूड के न देख | श्री ४२० | शंकर–जयकिशन |
| अब के बरस भेज | बंदिनी | सचिन देव बर्मन |
| दिल चीज क्या हैं आप मेरी | उमराव जान | खय्याम |
| उडे जब जब जुल्फे तेरी (रफी व कोरससह) | नया दौर | ओ.पी. नय्यर |
| यही वो जगह हैं | ये रात फिर ना आएगी | ओ.पी. नय्यर |
| आँखो से जो उतरी हैं | फिर वही दिल लाया हूँ | ओ.पी. नय्यर |
| भंवरा बडा नादान | साहब, बीबी और गुलाम | हेमंतकुमार |
| जाईए आप कहाँ जाएंगे | मेरे सनम | ओ.पी. नय्यर |
| कतरा कतरा मिलती हैं | इजाजत | आर.डी. बर्मन |
| आगे भी जाने ना तू | वक्त | रवी |
| इक परदेसी मेरा (रफींसह) | फागुन | ओ.पी. नय्यर |
| आँखो में क्या जी (किशोरकुमारसह) | नौ दो ग्यारह | सचिन देव बर्मन |
| दम मारो दम | हरे रामा हरे कृष्णा | आर.डी. बर्मन |
| सारा प्यार तुम्हारा (किशोरकुमार यांच्यासह) | आनंदआश्रम | श्यामल मित्रा |
| तंग आ चुके हैं कश्मकशे | लाइट हाऊस | एन. दत्ता |
| मेरा नाम हैं शबनम | कटीपतंग | आर.डी. बर्मन |
| चुरा लिया हैं (रफींसह) | यादों की बारात | आर.डी. बर्मन |
| बेकसी हद से जब | कल्पना | ओ.पी. नय्यर |
| पिया तू अब तो आजा | कारवाँ | आर.डी. बर्मन |
| ये मेरा दिल | डॉन | कल्याणजी–आनंदजी |
| जिंदगी इत्तफाक हैं | आदमी और इन्सान | रवी |
| ओ मेरे सोना रे सोना | तीसरी मंझिल | आर.डी. बर्मन |
| अजी चले आओ (लता मंगेशकर यांच्यासह) | हलाकू | शंकर–जयकिशन |

## थोडक्यात पण महत्वाचे



## क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती उत्सव साजरी

दौंड (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यातील गोपाळवाडी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची 199 वी जयंती गोपाळवाडी गावच्या सरपंच स्वाती राजू पवार, गोपाळवाडी गावच्या पोलीस पाटील वर्षाताई लोणकर यांच्या हस्ते सर्व महापुरुषांना पुष्पहार अर्पण करण्यात आला, यावेळी सरपंच स्वातीताई पवार पोलीस पाटील वर्षाताई लोणकर यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला यावेळी ग्रामपंचायत अधिकारी झुंबर होळकर, माजी उपसरपंच सुरज भुजबळ, शरद होले, प्रवीण होले, निलेश शेंडे, संदीप होले, विठ्ठल होले, दत्ता माने, पोपट बनसोडे, कल्पेश लांडगे आधीसह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

## अनंत नॅशनल युनिव्हर्सिटीनी १०० टक्क्यांपर्यंत शिष्यवृत्ती केली जाहीर

पुणे (आरंभ पर्व) : अनंत नॅशनल युनिव्हर्सिटी नी रँक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक विशेष शिष्यवृत्ती योजना जाहीर केली आहे. एअर २५० पर्यंत रँक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना १०० टक्क्यांपर्यंत शिष्यवृत्ती दिली जाईल. या अंतर्गत विद्यार्थ्यांची पूर्ण ट्युशन फी आणि होस्टेल फी माफ केली जाईल. तसेच एअर २५०० पर्यंत रँक असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची व्यवस्था ठेवण्यात आली आहे, ज्यामुळे अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळू शकेल. याशिवाय यूसीईईडी पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत आणखी एक मोठी सोय मिळणार आहे. त्यांना एडीईपीटी प्रवेश परीक्षा देण्याची गरज राहणार नाही आणि थेट मुलाखतीची संधी दिली जाईल. हा मार्ग विद्यार्थ्यांच्या यूसीईईडी मधील मेहनत आणि गुणवत्तेची दखल घेत तयार करण्यात आला आहे. यामुळे डिझाईन क्षेत्रात क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अधिक सोपी आणि स्पष्ट संधी उपलब्ध होईल. अशी विशिष्ट योजना विद्यापीठाच्या व्यापक ध्येयाचा भाग आहे ज्यामध्ये आर्थिक परिस्थिती कोणतीही असली तरी प्रतिभावान विद्यार्थ्यांना दर्जेदार डिझाईन शिक्षण मिळावे, यावर भार दिला जातो. गुणवत्ताधारित शिष्यवृत्तीबरोबरच विद्यापीठाकडून गरजेनुसार आर्थिक मदतही दिली जाते. यात अंशतः ते पूर्ण ट्युशन फी माफीपर्यंत मदत दिली जाऊ शकते. ही मदत विद्यापीठाच्या आर्थिक सहाय्य समिती द्वारे विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती जशी की उत्पन्न, बचत, गुंतवणूक आणि शिक्षण कर्ज यांचा विचार करून ठरवली गेली जाते.



## संविधान, समता व बंधुता यातूनच समाजाची वीण घट्ट होईल

पुणे (आरंभ पर्व) : "भवतालात तीव्रतेने पसरत असलेला द्वेषभाव, विषमता आणि तणावाचे वातावरण चिंताजनक आहे. जाती, धर्म आणि प्रांतवादाच्या युद्धजन्य परिस्थितीमध्ये माणुसकीचा बंध अधिक घट्ट होण्याची गरज असून, त्यासाठी सर्वच महामानवांनी दिलेल्या बंधुतेच्या विचारांचा अंगीकार करायला हवा. त्यातूनच जगात बंधुभाव आणि शांतता प्रस्थापित होण्यास मदत होईल," असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. सुभाष वारे यांनी केले. माणूस म्हणून आपण कधी जगणार आहोत, याचा विचार करण्याची वेळ आज आल्याचेही त्यांनी नमूद केले. विश्वबंधुता साहित्य परिषद, भारतीय जैन संघटनेचे वाघोली येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व काषाय प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २८ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे उद्घाटन प्रा. सुभाष वारे यांच्या हस्ते झाले. नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात आयोजित संमेलनाच्या अध्यक्षस्थानी बंधुताचार्य प्रकाश रोकडे होते. प्रसंगी प्राचार्य डॉ. अरुण आंधळे, ज्येष्ठ कवी प्रा. चंद्रकांत वानखेडे, कादंबरीकार प्रा. शंकर आथरे, निमंत्रक मंदाकिनी रोकडे, कार्याध्यक्ष प्राचार्या डॉ. मनीषा बोरा, स्वागताध्यक्ष शरयू पवार, कवयित्री संगीता झिंजुर्के आदी उपस्थित होते. प्रा. सुभाष वारे म्हणाले, "वर्चस्ववादाच्या भावनेतून गळेकापू स्पर्धेला बळ मिळत आहे. जाती-धर्मांतील द्वेष वाढीस लागला आहे. संत ज्ञानेश्वरांपासून जगद्गुरू तुकारामांपर्यंत आणि महात्मा फुले यांच्यापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत सर्वांनीच बंधुतेचा, माणुसकीचा संदेश दिला आहे. त्यांच्या नावाचा जयजयकार आपण करतो. मात्र, त्यांच्या विचारांना आत्मसात करीत नाही. जैविक समतेच्या आव्हानात्मक काळात आपल्याला बंधुतेचा विचार अधिक तीव्रतेने पेरावा लागेल. मनामनात भिनत असलेली विषमता, द्वेषभाव संपवायचा असेल, तर शिक्षणाच्या समान संधी देण्यासाठी पुढाकार घ्यावा लागेल. नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग आपला साथी म्हणून केला, तर ते आपल्यासाठी वरदान ठरेल. शुद्ध विचाराने त्याचा उपयोग सर्वांनीच केला पाहिजे."




# एमआयटी एडीटीचा बेंटली सिस्टिम्ससोबत करार

## डिजिटल पायाभूत सुविधा शिक्षणासाठी 'इन्फ्रास्ट्रक्चर इनोव्हेशन' उत्कृष्टता केंद्र सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ (एमआयटी एडीटी) आणि जागतिक स्तरावरील इन्फ्रास्ट्रक्चर अभियांत्रिकी सॉफ्टवेअर क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी बेंटली सिस्टिम्स यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. याचवेळी 'इन्फ्रास्ट्रक्चर इनोव्हेशन सेंटर ऑफ एक्सलन्स' या उत्कृष्टता केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. डिजिटल पायाभूत सुविधा शिक्षणाला चालना देणे आणि उद्योग-संलग्न शिक्षण अधिक सक्षम करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.




स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड सायन्सेस अंतर्गत सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमास बेंटली सिस्टिम्सचे दक्षिण आशिया विभागीय कार्यकारी कमलकन्नन तिरुवडी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी शैक्षणिक संचालक हर्ष नागपाल, वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक मोनिका जेधे आणि परमर्थ सैनी हे मान्यवर उपस्थित होते.

एमआयटी एडीटी विद्यापीठाकडून कार्याध्यक्ष व प्र-कुलपती डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक डॉ. सुनीता कराड, प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, तसेच सिव्हिल इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. युवराज भिरूड आदी उपस्थित होते.

याप्रसंगी 'इन्फ्रास्ट्रक्चर इनोव्हेशन सेंटर ऑफ एक्सलन्स' तसेच बेंटली स्टुडंट क्लबचे उद्घाटन करण्यात आले. या केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, स्मार्ट कन्स्ट्रक्शन तंत्रज्ञान आणि शाश्वत अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रगत शिक्षण व संशोधनाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थ्यांना ६५ हून अधिक उद्योगमान्य सॉफ्टवेअर, जागतिक प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि विशेष तांत्रिक प्रशिक्षण सुविधांचा लाभ मिळणार आहे.

प्रमुख पाहुणे कमलकन्नन तिरुवडी यांनी आपल्या भाषणात स्मार्ट शहरीकरणासाठी सॉफ्टवेअर-आधारित बुद्धिमान पायाभूत सुविधांचे वाढते महत्त्व अधोरेखित केले.

कार्याध्यक्ष व प्र-कुलपती डॉ. मंगेश कराड यांनी हा उपक्रम विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील डिजिटल अभियांत्रिकी कौशल्ये प्रदान करणारा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे सांगितले.

## अनाथ मुलांच्या हस्ते सातव्या 'सिंधी प्रीमिअर लीग'चे उद्घाटन

**पिंपरी-पुणे (दै. आरंभ पर्व)**

'सिंधी प्रीमिअर लीग'च्या सातव्या पर्वाचे उद्घाटन अनाथ मुलांच्या हस्ते झाले. येत्या ३ मेपर्यंत चालणारी ही क्रिकेट स्पर्धा पिंपरीतील मृणाल क्रिकेट ग्राउंडवर होत आहे. उद्घाटन सोहळ्यावेळी उद्योजक डब्बू आसवानी, श्रीचंद आसवानी, संयोजक नरेश नाशा, बिपीन दखनेजा, रोनक पंजाबी, अविनाश इसरानी, अंकुश मुलचंदानी, करण आसवानी, अवि तेजवानी, सोमेश गिडवाणी, कुणाल गुडेला, मनीष गेरेजा, यश थडानी, कंवल खियानी, गुलशन गंगवानी, कामेश पमनानी, पवन कोटवानी, मयूर तिलवानी यांच्यासह संघमालक व प्रायोजक उपस्थित होते. बिपीन दखनेजा म्हणाले, "सिंधी समाजातील तरुणांना खेळांसाठी प्रोत्साहन देण्यासह सिंधी संस्कृतीचे जतन आणि सामाजिक भावनेतून सेवाभावी संस्थांना मदत करण्याच्या




- **सातव्या सिंधी प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धेत**
- **झेलम क्वीन्स, हेमू कलानी ग्लॅडिएटर्सची विजयी सलामी**

उद्देशाने गेल्या सात वर्षांपासून ही क्रिकेट स्पर्धा होत आहे. आयपीएलच्या धर्तीवर होत असलेल्या या स्पर्धेत पुरुष गटात एकूण १६, तर महिला गटात एकूण सात संघ सहभागी झाले आहेत. पुरुषांच्या प्रत्येक संघाचे नाव सिंधी संस्कृतीशी, तर महिला संघांची नावे नद्यांशी निगडित आहेत."

# समर्या क्रिएशनचे 'औमोरा म्यूझिक' लाँच

## समीर अंजान यांच्या सहकार्याने क्रिएटर-फर्स्ट म्यूझिक लेबलची सुरुवात

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतातील क्रिएटर इकॉनॉमीने संगीतविश्वात एक महत्त्वाचे पाऊल टाकत समर्या क्रिएशनने 'औमोरा म्यूझिक' या नव्या म्यूझिक लेबलचे अधिकृत लाँच केले. मुंबईतील अंधेरी वेस्ट येथील द क्लबमध्ये झालेल्या या सोहळ्यात गिनीज वर्ल्ड रेकॉर्डधारक ज्येष्ठ गीतकार समीर अंजान हे संस्थापक भागीदार म्हणून सहभागी झाले. त्यामुळे या लेबलकडे संगीत क्षेत्रात मोठ्या अपेक्षेने पाहिले जात आहे.




समर्या क्रिएशनने 'औमोरा म्यूझिक'ला केवळ आणखी एक म्यूझिक लेबल म्हणून नव्हे, तर कलाकारकेंद्री व्यासपीठ म्हणून सादर केले आहे. भारतीय संगीत उद्योगाला दीर्घकाळापासून अशा एका मंचाची गरज होती, जिथे अल्गोरिदमपेक्षा कलाकाराच्या अभिव्यक्तीला अधिक महत्त्व दिले जाईल. त्या दृष्टिकोनातून 'औमोरा म्यूझिक'ची संकल्पना उभी करण्यात आली आहे.

चार दशकांहून अधिक कारकिर्दीत ६४० पेक्षा जास्त हिंदी चित्रपटांसाठी ४ हजारांहून अधिक गीते लिहिणारे समीर अंजान हे या उपक्रमात केवळ ब्रँड एम्बेसेडर नसून निर्माते म्हणूनही सक्रिय भूमिका पार पाडत आहेत. सध्या 'औमोरा म्यूझिक'चे १९ ट्रॅक्स १५० हून अधिक डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असून १५० पेक्षा अधिक मूळ रचना प्रदर्शित होण्यासाठी सज्ज आहेत. या रचनांमध्ये बॉलीवूड, भक्तिसंगीत, लोकसंगीत, बालगीते, रॅप आणि समकालीन पॉप अशा विविध प्रकारांचा समावेश आहे.

या वेळी समीर अंजान म्हणाले, "मी ४,५०० गाणी लिहिली आहेत. काय टिकते आणि काय दुसऱ्या दिवशी विसरले जाते, हे मला माहीत आहे. 'औमोरा म्यूझिक' म्हणजे खऱ्या अर्थाने काही सांगण्याची क्षमता असलेल्या कलाकारांचे घर आहे."

या लेबलच्या सर्जनशील नेतृत्वाची धुरा संगीतकार नील गांधी आणि निरज विश्वकर्मा यांच्या खांद्यावर आहे. नील गांधी हे पूर्वी वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित होते, तर निरज विश्वकर्मा यांनी संगणकशास्त्रातून संगीत क्षेत्राकडे वाटचाल केली. परंपरागत चौकट मोडून स्वतःचा स्वतंत्र ठसा उमटवणाऱ्या या दोघांमुळे 'औमोरा म्यूझिक'ला नव्या विचारांची जोड मिळाली आहे.

## इंद्रिया ज्वेलरीचा विस्तार; फिनिक्स मार्केटसिटीमध्ये चौथे स्टोअर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आदित्य बिर्ला ज्वेलरीचा प्रीमियम ब्रँड 'इंद्रिया'ने पुण्यातील विमाननगर येथील फिनिक्स मार्केटसिटीमध्ये आपले नवीन स्टोअर सुरू केले आहे. शहरातील हे ब्रँडचे चौथे स्टोअर असून, यामुळे महाराष्ट्रातील इंद्रियाची उपस्थिती अधिक मजबूत झाली आहे.

पूर्व पुण्यातील प्रमुख रिटेल आणि लाइफस्टाइल हब असलेल्या फिनिक्स मार्केटसिटीमध्ये उभारण्यात आलेले हे स्टोअर आधुनिक लक्झरी आणि ग्राहक-केंद्रित अनुभव देण्यावर भर देणारे आहे. सुजाण आणि शहरी ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन स्टोअरचे डिझाइन करण्यात आले असून, खरेदीचा मंत्रमुग्ध करणारा अनुभव देण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

या स्टोअरमध्ये ३२,००० हून अधिक दागिन्यांचे डिझाइन्स उपलब्ध आहेत. यात वधू-अलंकार, सण-उत्सवांसाठीचे दागिने, समकालीन डिझाइन्स तसेच दैनंदिन वापरासाठी हलक्या वजनाचे दागिने यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, येथे 'कारीगरी रूम'चीही सुविधा देण्यात आली असून ग्राहकांना दागिन्यांची कलाकुसर प्रत्यक्ष अनुभवता येते आणि डिझाइन प्रक्रियेत सहभाग घेण्याची संधी मिळते. इंद्रियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) संदीप कोहली यांनी यावेळी सांगितले, "पुणे ही आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची बाजारपेठ आहे. येथील ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडी आणि डिझाइन-आधारित दागिन्यांची वाढती मागणी लक्षात घेऊन आम्ही हा विस्तार केला आहे. चौथ्या स्टोअरच्या माध्यमातून अधिकाधिक ग्राहकांना उच्च दर्जाचा खरेदी अनुभव देण्याचा आमचा प्रयत्न आहे."




या नव्या स्टोअरच्या माध्यमातून इंद्रिया ब्रँडने पश्चिम भारतातील आपली पकड अधिक मजबूत केली असून, प्रीमियम ज्वेलरी रिटेल क्षेत्रातील आपली उपस्थितीही वाढवली आहे. समकालीन डिझाइन्स आणि ग्राहकाभिमुख सेवेमुळे इंद्रिया ब्रँड पुण्यातील वाढत्या आणि गतिमान बाजारपेठेत आपले स्थान अधिक भक्कम करत आहे.

## मुकबधीर विद्यालयात मोफत आरोग्य तपासणी शिबिर




**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

सामाजिक जाणीव जपत निरपेक्ष भावनेने मेमाणे परिवारातर्फे उरुळी कांचन येथील महावीर निवासी मुकबधीर विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सौ. अपेक्षा कौस्तुभ मेमाणे यांच्या वाढदिवसानिमित्त कस्तुरी केअर फाउंडेशन आणि विश्वराज हॉस्पिटल, लोणी काळभोर यांच्या संयुक्त विद्यमाने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांची विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. शारीरिक आरोग्यासोबतच त्यांच्या एकूण विकासावर लक्ष केंद्रित करत तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शनही केले. या उपक्रमामुळे विशेष मुलांच्या आरोग्याची काळजी घेण्याबाबत जागरूकता निर्माण झाली. यावेळी बोलताना अपेक्षा कौस्तुभ मेमाणे म्हणाल्या, "मुकबधीर विद्यार्थ्यांना शिक्षण, संस्कार, कला आणि क्रीडा क्षेत्रात घडवणे हे अत्यंत कसरतीचे काम आहे. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची गरज आहे."

# महात्मा फुले यांच्या क्रांतिकारी विचारांनी शिक्षणाला नवी दिशा

## प्रा. डॉ. संजय चोरडिया यांचे प्रतिपादन; सूर्यदत्त ग्रुपमध्ये महात्मा फुले यांची २०० वी जयंती साजरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"महात्मा फुले यांचे विचार हे आजच्या शिक्षण व्यवस्थेला दिशा देणारे आहेत. शिक्षणातून समाजपरिवर्तन घडवण्याची त्यांची भूमिका आजही तितकीच महत्त्वाची आहे. सूर्यदत्त परिवार हा त्यांच्या विचारांवर चालत विद्यार्थ्यांना केवळ शिक्षित नव्हे, तर सजग आणि जबाबदार नागरिक घडवण्यासाठी कटिबद्ध आहे," असे प्रतिपादन सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी केले. थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंती सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसमध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय, सातत्यपूर्ण आणि




परिणामकारक योगदानाबद्दल डॉ. रवी चौधरी यांना 'सुर्यभारत राष्ट्रीय पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. 'सूर्यदत्त'च्या बावधन कॅम्पसमध्ये आयोजित कार्यक्रमात 'सूर्यदत्त'च्या सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षीत कुशल, अधिष्ठाता डॉ. प्रतिक्षा वाबळे, डॉ. केतकी बापट, डॉ. सिमी रेठरेकर, डॉ. सारिका झांबड यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अत्यंत भव्य, दिमाखदार आणि प्रेरणादायी वातावरणात या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजप्रबोधन, स्त्रीशिक्षण, शेतकरी व वंचित घटकांच्या उन्नतीसाठी आयुष्य वेचणाऱ्या महात्मा फुले यांच्या कार्याला अभिवादन करत हा सोहळा विचारांचा खरा जागर ठरला. संपूर्ण परिसर शिक्षण हेच खरे परिवर्तनाचे साधन या संदेशाने भारून गेला.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले की, केवळ पदवी मिळवणे हेच उद्दिष्ट नसून, समाजासाठी संवेदनशील नागरिक घडणे ही खरी शिक्षणाची फलश्रुती आहे. सूर्यदत्त संस्थेच्या माध्यमातून ज्ञानाबरोबरच संस्कार, मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी रुजवली जात असल्याचे त्यांनी ठामपणे अधोरेखित केले. सकारात्मक दृष्टीकोन, समर्पण, मूल्याधिष्ठित जीवन आणि सामाजिक उत्तरदायित्व जपण्याचा प्रभावी संदेश त्यांनी दिला.

डॉ. रवी चौधरी म्हणाले, "महात्मा फुले यांच्या जयंतीदिनी हा सन्मान मिळणे ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि प्रेरणादायी बाब आहे. त्यांच्या विचारांनीच मला शिक्षण क्षेत्रात कार्य करण्याची प्रेरणा दिली. शिक्षण हे केवळ करिअर घडवण्याचे साधन नाही, तर ते समाज बदलण्याची शक्ती आहे. प्रत्येक विद्यार्थी हा परिवर्तनाचा वाहक आहे. त्याने स्वतःबरोबर समाजालाही उन्नत करण्याचा संकल्प केला पाहिजे." विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित सादरीकरणे, विचारमंथन आणि सामाजिक संदेश देणारे उपक्रम सादर केले. संपूर्ण कार्यक्रम प्रेरणादायी, ऊर्जादायी आणि विचारांना चालना देणारा ठरला. सूत्रसंचालन डॉ. सुनील धनगर यांनी केले. राष्ट्रप्रेमाच्या भावनेने ओतप्रोत भरलेल्या वंदे मातरमने समारोप करण्यात आला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.